२० पृष्ठ

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव
**P.S.(ठाणे):** तुळजापूर
**Year (वर्ष):** 2026
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0108
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**05/03/2026 00:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 04/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 04/03/2026
**Time From (वेळेपासून):** 15:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 05/03/2026
**Time (वेळ):** 00:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 05/03/2026 00:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 0.01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेशन तुळजापुर, तुळजापुर,तुळजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बाळासाहेब मनोहर नरवटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धारा,धाराशिव ,तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धारा,धाराशिव ,तुळजापूर,धाराशिव,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9309102143

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीनिवास रामदास आरदवाड | | | 1. संभाजीनगर, धाराशिव , धाराशिव ,तुळजापूर,धाराशिव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 10 चलनी | 5,000.00 |



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | नोटा | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी बाळासाहेब मनोहर नरवटे, वय 37 वर्ष, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धाराशिव. मोबाईल नंबर 9309102143,
समक्ष पोलीस ठाणे तुळजापुर येथे हजर राहुन फिंयाद देतो की, मी दिंनाक 04.03.2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धाराशिव येथे हजर असताना, मला पोलीस उप अधीक्षक योगेश वेळापुरे यांनी त्यांचे चेंबर मध्ये बोलावुन तक्रारदार रामेश्वर प्रभाकर पुजारी, वय 38 वर्ष, व्यवसाय- सेक्युरिटी गार्ड, तुळजाभवानी मंदिर, तुळजापुर, रा.धारुर, ता.जि.धाराशिव यांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार घेवुन पुढील कारवाई करणे बाबत आदेशित केले. त्यावरुन मी तक्रारदार रामेश्वर पुजारी यांना माझे केबिनमध्ये बोलवुन त्यांना त्यांची तक्रार विचारली असता, त्यांनी त्यांची तक्रार सांगितली. त्यातील थोडक्यात मजकुर असा की, तक्रारदार यांचेविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापुर येथे गुरनं 82/2026, कलम 281, 125(a), 125(b), बी.एन.एस.एस.अधिनियम 2023 सह कलम 184 मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास सपोफौ/21 आरदवाड, पो.स्टे.तुळजापुर यांचेकडे आहे. सदर गुन्हयामध्ये यातील तक्रारदार हे आरोपी असल्याने आरदवाड साहेब यांनी त्यांना पो.स्टे.तुळजापुर येथे दिंनाक 26.02.2026 रोजी बोलावुन घेवुन त्यांना नमुद गुन्हयामध्ये चेहरीपटटी फॉर्म व ब्रॉण्ड घेवुन गुन्हयामध्ये सहकार्य करतो असे म्हणुन त्यांचेकडे 10,000/- रुपये घेतले होते. त्यानंतर दिंनाक सदर गुन्हयातील जखमी आत्माराम पवार हे दिंनाक 28.02.2026 रोजी मयत झाल्याने आरदवाड साहेब यांनी तक्रारदार यांना फोन करुन पुन्हा पोलीस ठाणे तुळजापुर येथे भेटण्यासाठी बोलविले होते. त्यावरुन तक्रारदार व त्यांचे गावातील उपसरपंच असे दिंनाक 02.03.2026 रोजी तुळजापुर पोलीस स्टेशन येथे जावुन त्यांनी आरदवाड साहेब यांची भेट घेतली. तेव्हा आरदवाड यांनी सदर गुन्हयातील जखमी हे मयत झाले असुन गुन्हयामध्ये कलमवाढ न करण्यासाठी व मोटार सायकल जप्त न करण्यासाठी आणखी 15,000/- रुपये लाचेची मागणी केली. वगैरे मजकुरचा तक्रारी अर्ज दिला. त्यावरुन आम्ही तालुका कृषी अधिकारी, धाराशिव यांना लेखी पत्र देवुन दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यावेळी मी तक्रारदार, पंच व स्टाफ यांचा आपसी परिचय करुन दिला. त्यानंतर माझे सुचनेवरुन तक्रारदार पुजारी यांनी त्यांची तक्रार दोन्ही पंचासमक्ष पुन्हा सांगितली. त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेली लेखी तक्रार व तोंडी तक्रार एकच असल्याची पंचाची खात्री झाल्यानंतर पंच क्रमांक 1 म्हणुन माकोडे व पंच क्रमांक 2 म्हणुन मगर यांनी तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर शासकीय वाहनाने तक्रारदार, पंच व सापळा पथक असे कारवाईसाठी लागणारे सर्व साहित्यासह ला.प्र.वि.कार्यालय, धाराशिव येथुन रवाना होवुन तुळजापुर नळदुर्ग बायपास रोड, तुळजापुर येथे रोडलगत सुरक्षित ठिकाणी जावुन थांबलोत.
त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिंनाक 04.03.2026 रोजी आरदवाड साहेब यांची पोलीस ठाणे, तुळजापुर येथे समक्ष भेट घेण्यासाठी पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्याचा निंणय घेतला. त्यानंतर तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिंल्यानतर तक्रारदार व पंच असे त्यांचेकडील मो.सा.ने रवाना होवुन पोलीस स्टेशन तुळजापुर येथे गेले. सदर ठिकाणी तक्रारदार यांनी आरदवाड साहेब यांची पंचासमक्ष भेट घेतली. तेव्हा त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले व आरदवाड साहेब हे कामात असल्याने त्यांनी तक्रारदार यांना थोडया वेळाने पुन्हा भेटण्यासाठी बोलविल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर थोडया वेळाने पुन्हा आरदवाड साहेब यांची पोलीस ठाणे, तुळजापुर येथे समक्ष भेट घेण्यासाठी तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन दिंल्यानतर तक्रारदार व पंच असे त्यांचेकडील मो.सा.ने रवाना होवुन पोलीस स्टेशन तुळजापुर येथे गेले. सदर

or (ज्या कारण
(4) Transferr
(गुन्हा त

ठिकाणी तक्रारदार यांनी आरदवाड साहेब यांची पंचासमक्ष भेट घेतली. तेव्हा त्यांचेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. दरम्यान आरदवाड साहेब यांनी तक्रारदार यांचेकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 5000/- रुपये लाच रक्कम लागलीच घेवुन येणे बाबत सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन लोकसेवक आरदवाड यांचेविरुध्द पोलीस ठाणे तुळजापुर येथे सापळा आजमावण्याचे सर्वानुमते ठरले.
त्यावरुन दिंनाक 04.03.2026 रोजी पंच माकोडे यांना तक्रारदार पुजारी यांचे सोबत जाण्याच्या व तक्रारदार यांना इतर उपयुक्त सुचना दिल्यानतर ॲथ्रसीन पावडर लावलेली लाच रक्कम 5,000/- रुपये हि तक्रारदार यांचे पॅन्टच्या समोरील उजवे बाजुच्या खिस्यामध्ये ठेवुन त्या उजव्या हाताने लोकसेवक आरदवाड यांना देवुन त्यांनी जर ते घेतल्या तर डाव्या हाताने शर्टाची बाही मुडपण्याचा सुचक इशारा करावा असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर पंच क्रमांक 01 माकोडे  यांचे समक्ष तक्रारदार यांच्या शर्टचे आतमध्ये बनीयानला आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर चालु करुन पिनने लावण्यात आला पंच क्र 2  मगर यांना आजुबाजुला राहुन सर्व सापळा करवाईमध्ये होणारे घडामोडीवर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 01 माकोडे यांना आरदवाड साहेब यांची भेट घेण्यासाठी पोलीस ठाणे, तुळजापुर येथे रवाना केले. त्यांचे मागे सापळा कारवाईतील अधिकारी व अंमलदार हे रवाना झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी आरदवाड साहेब यांची पोलीस स्टेशनचे गेटवर भेट घेवुन अँथ्रासिन पावडरयुक्त लाच रक्कम पंचासमक्ष आरदवाड यांना देवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित ईशारा केला. तेव्हा तात्काळ सापळा पथक घटनास्थळी येत असल्याचे पाहुन आरदवाड हे लागलीच त्यांचे रुममध्ये गेले. त्यानंतर सापळा पथक देखील तात्काळ त्यांचे रुममध्ये गेले व आरदवाड यांना ताब्यात घेतले. तेव्हा पंचासमक्ष त्यांनी स्विकारलेल्या लाच रक्कमेचे अनुषंगाने त्यांचेकडे विचारपुस केली. तेव्हा त्यांनी लाच रक्कम त्यांचेकडे नसल्याचे सांगितले. त्यावरुन आम्ही पंचाचे मदतीने त्यांची अंगझडती घेतली. परंतु लाच रक्कम त्यांचे अंगझडतीमध्ये मिळुन न आल्याने आम्ही सदर रुममधील लाईट बंद करुन अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पचे आधारे आरदवाड यांचे उजवे हाताची पाहणी केली असता, हातावर ठिकठिकाणी ॲंथ्रासिन पावडरची हिरवट रंगाची दिसुन आली. त्यावरुन आम्ही त्यांचे रुममध्ये शोधाशोध केली. तेव्हा सदरची लाच रक्कम सदरचे रुममध्ये लोखंडी पेटीच्या मागे मिळुन आली. सदर रक्कमेची पंच क्रमांक 2 यांचेकडील कागदावर लिहिलेल्या नोटांच्या क्रमांकाची तुलना करुन पाहणी केली असता, 500/- रुपये दराच्या 10 चलनी नोटा ज्याचे क्रमांक व पंच क्रमांक 2 यांचेकडील कागदावर लिहिलेले क्रमांक एकच असल्याचे दिसुन आले. सदर ॲंथ्रासिन पावडरयुक्त 5000/- रुपये पंच क्रमांक 02 मगर यांचे ताब्यात देण्यात आल्या. घटनास्थळावरील सापळा करवाई पूर्णकरुन आम्ही पुढील कारवाई करण्यासाठी ला.प्र.वि.कार्यालय, धाराशिव येथे आलो. सदर सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
तरी लोकसेवक श्रीनिवास रामदास आरदवाड, वय 48 वर्ष, सपोफौ/21, पोलीस ठाणे, तुळजापुर, रा.संभाजीनगर, धाराशिव  यांनी तक्रारदार रामेश्वर पुजारी यांचेवर पोलीस ठाणे तुळजापुर येथे दाखल गुरनं 82/2026 मध्ये कलमवाढ न करण्यासाठी व गुन्हयात मोटार सायकल जप्त न करण्यासाठी तक्रारदार याचेकडे पंचासमक्ष 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडअंती 5000/- रुपये स्विकारण्याचे मान्य करुन  तक्रारदार यांचेकडुन 5000/- रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने माझी त्यांचे विरुध्द भ्रष्ट्चार प्रतिंबधक अधिनियम 1988 कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे कायदेशीर फिंयाद आहे.

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

ANNASAHEB RAMCHANDRA MANJARE(I (Inspector)) / PCMH25624

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):

on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): ANNASAHEB RAMCH

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): PCMH25624

पोलीस ठाणे,अंमलदार
पोलीस स्टेशन,तुळजापूर



Scanned with OKEN Scanner